स्थापना : १९५६

निर्मल ग्रामपुरस्कार व महात्मा गांधी तंटामुक्त पुरस्कार व पर्यावरण पुरस्कार प्राप्त.

# ग्रामपंचायत खरवते

तालुका राजापूर, जि. रत्नागिरी, पिन कोड ४१६७०५

Email Id : grampanchayatkharavate@gmail.com

श्री. अभय दशरथ चौगुले, सरपंच, मो. ९८२३४१९९११

श्री. गौरव काशिनाथ सोरप, उपसरपंच, मो. ७२७६५३६०११

श्रीम. नेहा दिनेश कुर्डाळी, ग्रामसेविका, मो. ९०२८७५५३१३

## ग्रामसभा दि.२८/०८/२०२४ ची खरी नक्कल

### ठराव क्र.९/४

**विषय क्र.९/४:-** नूतनीकरण ऊर्जा स्त्रोत वापर व शून्य कार्बन उत्सर्जन व सौरउर्जा वापर बाबत जनजागृती.......

**ठराव क्र.९/४:-** सूर्यप्रकाश हा आपल्या ग्रहावरील सर्वात मुबलक आणि मुक्तपणे उपलब्ध असलेल्या ऊर्जा संसाधनांपैकी एक आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर 1 तासात पोहोचणारी सौरऊर्जेची मात्रा संपूर्ण वर्षभराच्या ग्रहाच्या एकूण ऊर्जेपेक्षा जास्त आहे. हे एक परिपूर्ण नूतनीकरणक्षम ऊर्जा स्त्रोतासारखे वाटत असले तरी, आपण दिवसाच्या वेळेनुसार आणि वर्षाच्या हंगामानुसार तसेच भौगोलिक स्थानानुसार सौर उर्जेचा वापर करू शकतो. सौर ऊर्जा ही सौर विकिरण ऊर्जा आहे, त्यात विकिरण आणि उष्णता असते. या तंत्रज्ञानामध्ये आम्ही सोलर हीटिंग, फोटोव्होल्टेइक , सौर औष्णिक ऊर्जा आणि कृत्रिम प्रकाशसंश्लेषण समाविष्ट करतो . हा अक्षय ऊर्जेचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे आणि व्यापकपणे सक्रिय किंवा निष्क्रिय सौर उर्जेचे वैशिष्ट्य आहे. सक्रिय मध्ये आम्ही फोटोव्होल्टेइक प्रणाली , केंद्रित सौर उर्जा आणि सौर वॉटर हीटिंग समाविष्ट करतो . निष्क्रिय सौर तंत्र यामध्ये दाखवले आहे.पृथ्वीला 174,000 TW (टेरावॅट) सौर विकिरण प्राप्त झाले, ते पृथ्वीच्या भूपृष्ठाद्वारे , महासागर, नद्या इत्यादीद्वारे शोषले जाते. पृथ्वीचे वातावरण, महासागर आणि जमीनीद्वारे एकूण सौरऊर्जा घेतलेली सुमारे 385,000 EJ (exa-joules) प्रति वर्ष. 30 नोव्हेंबर 2021 पर्यंत देशाची सौर स्थापित क्षमता 48.556 GW होती. सौरऊर्जेचा वापर पाणी गरम करणे, स्वयंपाक प्रक्रिया आणि फोटोव्होल्टेइक सेल इत्यादी म्हणून वीज उत्पादनात मोठ्या प्रमाणात होतो.तरी माझी वसुंधरा अभियान ५.0 अंतर्गत नूतनीकरण उर्जा, शून्य कार्बन उत्सर्जन व सौरउर्जा वापरा बाबत जनजागृती करण्यात येऊन वापर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले .

सूचक :- श्री.भास्कर पर्शुराम गुरसाळे.

अनुमोदक :- श्री.दयानंद बाबाजी चौगुले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खरवते

सरपंच
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी.

स्थापना : १९५६
निर्मल ग्रामपुरस्कार व महात्मा गांधी तंटामुक्त पुरस्कार व पर्यावरण पुरस्कार प्राप्त.
ग्रामपंचायत खरवते
तालुका राजापूर, जि. रत्नागिरी, पिन कोड ४१६७०५
Email Id : grampanchayatkharavate@gmail.com

श्री. अभय दशरथ चौगुले
सरपंच
मो. ९८२३४१९९१९

श्री. गौरव काशिनाथ सोरप
उपसरपंच
मो. ७२७६५३६०१९

श्रीम. नेहा दिनेश कुडाळी
ग्रामसेविका
मो. ९०२८७५५३१३

## ग्रामसभा दि.२८/०८/२०२४ ची खरी नक्कल

## ठराव क्र.९/३

**विषय क्र.९/३** :- फटाके बंदी...

**ठराव क्र.९/३**:- बेरियम आणि तत्सम रसायनांमुळे तयार झालेल्या फटाक्यांवर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली आहे भारतात अनेक भागात जास्त करून शहरी भागात वायू प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झालेला आहे हवेत pm2.5 आणि pm10 अशी दोन प्रमुख प्रदूषक असतात या कणांच्या आकारावरून त्यांची नावे मिळाली आहेत अडीच मायक्रोन पेक्षा कमी व्यास असणाऱ्या कणांना पीएम 2.5 म्हणतात तर 2.5 ते 10 मायक्रोन एवढा आकार असणाऱ्या प्रदूषकांना पी एम १० असं म्हणतात विशेष म्हणजे हे कण उघड्या डोळ्यांना दिसत नाहीत त्यामुळे ते अगदी सहज तुमच्या नाकातून किंवा घशातून तुमच्या शरीरात जातात त्यामुळे दमा हृदय विकार ब्रोंकाइटिस आणि श्वसनाचे इतर आजार होऊ शकतात फटाक्यांमध्ये १५ प्रकारचे विषारी घटक असतात त्यामुळे दिवाळीनंतर मोठ्या प्रमाणात मोठ्या शहरांमध्ये शासनाचे आजार बळावतात. आपल्याकडे सण उत्सव आणि फटाके यांचे समीकरण दिसून येते परंतु या प्रदूषणकारी विषारी फटाक्यांमुळे ध्वनी व वायू प्रदूषणामुळे पर्यावरणाची पर्यायाने पशुपक्ष्यांची मानवांच्या आरोग्याची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे यासाठी माझी वसुंधरा अभियान 5.0 अंतर्गत आपल्या गावामध्ये फटाके बंदी करून पर्यावरण पूरक दीपोत्सव साजरा करून दिवाळी व इतर सण उत्सव समारंभ साजरा करूया असा सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.

सूचक :- श्री.भास्कर पर्शुराम गुरसाळे.

अनुमोदक :- श्री.दयानंद बाबाजी चौगुले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी

सरपंच
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी

स्थापना : १९५६
निर्मल ग्रामपुरस्कार व महात्मा गांधी तंटामुक्त पुरस्कार व पर्यावरण पुरस्कार प्राप्त
ग्रामपंचायत खरवते
तालुका राजापूर, जि. रत्नागिरी, पिन कोड ४१६७०५
Email Id : grampanchayatkharavate@gmail.com

श्री. अभय दशरथ चौगुले
सरपंच
मो. ९८२३४१९९१९

श्री. गौरव काशिनाथ सोरप
उपसरपंच
मो. ७२७६५३६०१९

श्रीम. नेहा दिनेश कुडाळी
ग्रामसेविका
मो. ९०२८७५५३१३

## ग्रामसभा दि.२८/०८/२०२४ ची खरी नक्कल

### ठराव क्र.९/२

**विषय क्र.९/२** :- कृषी कचरा जाळण्यावर बंदी...

**ठराव क्र.९/२**:- कृषी कचरा जाळणे हे भारतातील प्रदूषणाचे एक प्रमुख कारण आहे पिकांचे अवशेष झाल्याने 149.24 दशलक्ष टन कार्बन डाय-ऑक्साइड नऊ दशलक्ष कार्बन मोनॉक्साईड 0.25 दशलक्ष टन सल्फर बाहेर पडून मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होते .आपल्या कोकणचा विचार करता आपल्याकडे भात नाचणी पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते भाताचा पेंढा जळाल्याने उष्णता १ सेंटीमीटर जमिनीत शिरते त्यामुळे तापमान 33.8 ते 42.2° c पर्यंत वाढते हे सुपीक मातीसाठी आवश्यक असलेल्या जिवाणू आणि बुरशीजन्य जिवाणू तसेच सूक्ष्मजीवांचा नाश करते तसेच सेंद्रिय गुणवत्तेचे नुकसान होते मित्र किडीच्या नुकसानीमुळे शत्रू कीटकांचा खूप वाढला आहे परिणामी पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे तसेच धुरामुळे खोकल, दम्याचे प्रमाण वाढले आहे. पिकांचे अवशेष जाळणे हा आयपीसी च्या कलम 188 अन्वये आणि 1981 च्या वायुप्रदूषण नियंत्रण कायद्यानुसार गुन्हा आहे.तरी माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पिकांचे अवशेष न जाळता मातीत कुजून सेंद्रिय खत निर्मिती करण्यात यावे असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :- श्री.भास्कर पर्शुराम गुरसाळे.

अनुमोदक :- श्री.दयानंद बाबाजी चौगुले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी

सरपंच
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी

स्थापना : १९५६
निर्मल ग्रामपुरस्कार व महात्मा गांधी तंटामुक्त पुरस्कार व पर्यावरण पुरस्कार प्राप्त.
ग्रामपंचायत खरवते
तालुका राजापूर, जि. रत्नागिरी, पिन कोड ४१६७०५
Email Id : grampanchayatkharavate@gmail.com

श्री. अमय दशरथ चौगुले
सरपंच
मो. ९८२३४१९९९९

श्री. गौरव काशिनाथ सोरप
उपसरपंच
मो. ७२७६५३६०१९

श्रीम. नेहा दिनेश कुडाळी
ग्रामसेविका
मो. ९०२८७५५३१३

## ग्रामसभा दि.२८/०८/२०२४ ची खरी नक्कल

### ठराव क्र.९/५

**विषय क्र.९/५** :- आपत्ती व्यवस्थापन जनजागृती.....

**ठराव क्र.९/५**:- आपत्ती व्यवस्थापनाची व्याख्या आपत्ती टाळण्यासाठी किंवा त्याचे नंतरचे परिणाम व्यवस्थापित करण्याची प्रक्रिया म्हणून केली जाते . नैसर्गिकरीत्या किंवा मानवनिर्मित कृतींमुळे घडणारी दुर्घटना, ज्याचा परिणाम विनाशकारी होतो. मात्र आगाऊ खबरदारी घेतल्यास या दुर्घटना टाळता येतील. हवामान बदलाबाबतची अपुरी माहिती, नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर, आपत्ती व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाचा वापराचा अभाव इत्यादींमुळे जीवित व मालमत्तेची हानी होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. वातावरणीय बदलांमुळे पावसाच्या सुरुवातीला किंवा परतीच्या पावसाच्या वेळी समुद्रातीलअति उष्णता वाढीमुळे चक्रीवादळ निर्माण होण्याची परिस्थिती वाढत चालली आहे. तोक्ते वादळ, निसर्ग चक्रीवादळ याचे परिणाम आपण बघितले आहेत, आणि या वातावरणातील उष्णता वाढीस आपण सर्वस्वी जबाबदार आहोत. वीज पडून जीवितहानी होण्याचे प्रमाण देखील सध्या जास्त वाढत असल्याचे दिसून येत आहे. अगदी दोन वर्षांपूर्वीच आलेली कोरोना सारखी महामारी ही देखील जगातील एक मोठी आपत्तीच होती. तरी माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन जनजागृती करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :- श्री.भास्कर पर्शुराम गुरसाळे.

अनुमोदक :- श्री.दयानंद बाबाजी चौगुले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी

सरपंच
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी.

स्थापना : १९५६
निर्मल ग्रामपुरस्कार व महात्मा गांधी तंटामुक्त पुरस्कार व पर्यावरण पुरस्कार प्राप्त.
ग्रामपंचायत खरवते
तालुका राजापूर, जि. रत्नागिरी, पिन कोड ४१६७०५
Email Id : grampanchayatkharavate@gmail.com
श्री. अभय दशरथ चौगुले
सरपंच
मो. ९८२३४१९९९९
श्री. गौरव काशिनाथ सोरप
उपसरपंच
मो. ७२७६५३६०११
श्रीम. नेहा दिनेश कुडाळी
ग्रामसेविका
मो. ९०२८७५५३१३

## ग्रामसभा दि.२८/०८/२०२४ ची खरी नक्कल

### ठराव क्र.९/६

**विषय क्र.९/६:**-ध्वनी प्रदूषण रोखण्याबाबत....

**ठराव क्र.९/६:**-पर्यावरणीय प्रदूषणे मानवी आरोग्यासाठी धोकादायक गोष्टींपैकी सर्वात जास्त धोकादायक आहे मोठ्या आवाजातील डीजे - संगीत ड्रायव्हिंग हॉर्न यामुळे ध्वनी प्रदूषण होते ज्यामुळे उच्च रक्तदाब ,निद्रानाश आणि कर्णबधीरपणा असे अनेक आजार उद्भवू शकतात मानवी कानाने ऐकू येणारा सामान्य आवाज १ डीबी आहे 30 डीपी ते 140 डीबी पर्यंतची श्रेणी मानवासाठी अतिशय धोकादायक आहे मोठ्या आवाजाच्या सततच्या संपर्कात राहिल्याने कानाचा पडदा खराब होतो त्यामुळे श्रवण शक्ती देखील कमी होते मोठ्या कर्ण कर्कश आवाजामुळे पक्षांची अंडी देखील फुटतात व पर्यावरणाच्या हानी होते. तरी माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत ध्वनी प्रदूषण रोखण्याबाबत जनजागृती करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :- श्री.भास्कर पर्शुराम गुरसाळे.

अनुमोदक :- श्री.दयानंद बाबाजी चौगुले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर,जि.रत्नागिरी

सरपंच
ग्रामपंचायत खरवते
ता.राजापूर.जि.रत्नागिरी.